# ROTARY CLUB OF KOLHAPUR CENTRAL NEWS

RI DISTRICT 3170 | CLUB NO. : 15656 | CHARTER NO. : 15656 | ESTD ON : 13.05.1978

## MONTHLY BULLETIN JANUARY 2025



**Rtn. Stephanie Urchick**
Rotary International President



**Rtn. Sharad Pai**
District Governor (RID 3170)



**Rtn. Sanjay Bhagat**
Club President



**Rtn. Rahul Kulkarni**
Asst. Governer



**Rtn. Ravindra Khot**
Secretory



**Rtn. Nilesh Patil**
Treasurer

ISSUE No. 01
PUBLISH DATE : 1 Feb. 2025

**Bulletin Editor :**
Rtn. Rohanraj Shinde
Rtn. Abhay Sonavane




On 2nd January 2025 Rotary Club of Kolhapur Central organized Art Employability Opportunity Godhadi Training One Day Workshop in collaboration with Mrs. Smita Khamkar the Export Consultant Designer from Kolhapur “Shahid Veerpatni Lakshmi Girls College”, Titwe, District- Radhanagari, Kolhapur. On this occasion Mrs. Smita madam took the girls by showing various types of demonstrations like cushions, curtains, wall hangings, purses, wallets, decorative backdrops. More than hundred girls participated in this workshop.The reactions given by the girls after the workshop were very eloquent and positive. Because this art is useful in the life of every girl, these girls can do small and big business from it and can make their family's financial progress.Kits of materials required for the workshop were provided to the girls free of cost by the Rotary Club of Kolhapur Central. On this occasion, the principal of the college Mr. Palkar sir gave an introduction and gave information about the college.Rtn.Sanjay Bhagat, President of Rotary Central gave an orientation speech to the students and assured that Rotary Central will continue to help Shahid College. On this occasion, Project Chairman Rtn.Dr. Badam Patil, Rtn.Dr. Sagar Chowgle, Club Secretary Rtn.Ravindra Khot, Ann.Mrs.Sanyogita Bhagat were present.

---

From the Rotary Club of Kolhapur Central! In collaboration with Kohinoor Metallics, we are delighted to announce the completion of a new toilet facility at Vidya Mandir No. 3, Ramnagar, Shiye, under our infrastructure improvement initiative. The facility includes emergency toilet units for boys, girls, and children with disabilities.The inauguration ceremony, held on Friday, January 10, also included the distribution of school materials. Chief guests for the event were Ms. Meena Shendkar, Education Officer (Primary) of Zilla Parishad Kolhapur, and Mr. Bharat Rasale, State President of the Private Primary Teachers Sevak Committee. The program began with an introduction by the school principal, Mrs. Khamkar.During the event, Principal Rtn. Dr. Mahadev Narke shared his views, while Rotary Club President Rtn. Sanjay Bhagat highlighted Rotary’s community work. Ms. Meena Shendkar and Mr. Bharat Rasale were honored for their contributions, and Project Chair Rtn. Rahul Mane was recognized for his significant efforts toward the project. Ms. Shendkar addressed the gathering, emphasizing the importance of social organizations like Rotary in enhancing infrastructure for primary schools and shared her insights into the educational sector's needs. Mr. Rasale appreciated Rotary's work and offered his guidance. The event was graced by Shiye village Sarpanch Mrs. Shital Kadam, Deputy Sarpanch Mr. Dasharath Gurav, Gram Panchayat Member Mrs. Chhaya Bua, former Gram Panchayat Member Mr. Babaso Bua, and other local dignitaries. Several Rotarians from the Rotary Club of Kolhapur Central, including Rtn. Sandeep Salokhe, Rtn. Avinash Chiknis, Rtn. Vijay Yevluje, Rtn. Badam Patil, Rtn. Rajesh Adke, Rtn. Naresh Shingade, Club Secretary Rtn. Ravindra Khot, as well as Omkar Bhagat and Sunil mane from Kohinoor Metallics,school staff, and villagers, were present. The total project cost was Rs. 185,000.





पुढारी

रोटरी क्लब व कोहिनूर मेटॅलिक्सतर्फे शिये येथे टॉयलेट युनिटचे उद्घाटन

तरुण भारत

विद्यामंदिर शियेला स्वच्छतागृहाचे लोकार्पण

शिये : पायाभूत सुविधा उद्घाटन प्रसंगी प्राथमिक शिक्षण अधिकारी मीना शेंडकर, शेजारी शितल कदम, भरत रसाळे, संजय भगत, महादेव नरके, अविनाश चिकनिस.

श्रीरामनगर येथील विद्या मंदिर शाळा क्रमांक ३ येथे पायाभूत सुविधांचे उद्घाटन

सकाळ


वाचनातून बुद्धीचा विकास : शेंडकर



Various school-level competitions were organized for deaf boys and girls through an organization called Setu. On this occasion, Rtn.Sanjay Bhagat interacted with the participants and their parents. He expressed his heartfelt wishes, stating that while God may have left some physical challenges in these children, He has surely blessed them with other unique abilities. He praised the dedication of the teachers, applauded the efforts of the participants, and extended his best wishes for their bright future.

On behalf of the Rotary Club of Kolhapur Central, in collaboration with Rajshree Shahu Jestha Nagarik Seva Sangh and with the support of the Shahupuri Police Station Kolhapur, a *Senior Citizens Fast Walking Competition* was organized on Sunday, 19th January, at 7:00 AM at Tararani Chowk, Kolhapur. The event was inaugurated with the waving of the green flag by, President of Rotary Central Rtn. Sanjay Bhagat and Rtn.Naresh Shingade and Members of the Club. The competition saw enthusiastic participation from senior citizens, both male and female, aged 60 and above, who joined in large numbers. This annual event has been conducted by the Rotary Club of Kolhapur Central for the past 18 years with the aim of spreading joy, fostering new friendships, and offering a unique experience beyond the concept of winning or losing at this stage of life.




Rotary Club of Kolhapur Central 2024-25

Notice

Date: 19/01/2025

Dear Member,
You are cordially invited to attend the Jan.3rd weekly Meeting will be held on Monday 20th Jan 2025 at 7 pm at मोतीबाई दोशी मेमोरियल हॉल रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर, स्वयम् स्कूल, नवीन कोर्ट च्या मागे कसबा बावडा रोड, कोल्हापूर

Subject: Jan 3rd Weekly Meeting

This Meeting is arranged to Discuss following points

1) RPL Event Planning
2) Blind RYLA (NAB)Planning activities Disscusion 24 and 25 jan
3) District Grant Project Preparation
4) New Project Planning

All members are requested to be present on time

Time: 7 pm

Menu: - पावभाजी

| Rtn.Sanjay Bhagat | Rtn. Ravindra Khot | Rtn. Nilesh Patil |
| --- | --- | --- |
| President | Secretary | Treasurer |



In January 2025, the third weekly meeting of the month was successfully conducted at the club hall. Alongside this, a special ***Makar Sankranti Haldi-Kunku*** gathering was organized for the Ann's of Rotary Central. The event brought members together to celebrate the spirit of Makar Sankranti with joy by wearing traditional attire and playing Traditional games and cultural significance, fostering camaraderie and strengthening bonds within the club.




A two-day Personality Development Camp for blind boys and girls was organized by the Rotary Club of Kolhapur Central in association with the National Association for the Blind (NAB) Kolhapur on January 24-25, at Chaitanya Resort, Sadle-Madale. On January 24, participants were transported from NAB's Shahupuri office to the scenic Chaitanya Resort in a bus provided by DY Patil Group. The camp's opening ceremony, held at 11:30 AM, was graced by Rotary Club President Rtn. Sanjay Bhagat, AG.Rtn. Rahul Kulkarni, Rtn. Badam Patil, Rtn. Vijay Relekar, NAB Kolhapur President Shri Muralidhar Dongre, Mrs. Pallavi Kadam, and Mrs. Ujwala Bhanushali, along with other dignitaries and participants. The day included self-introductions, lunch, and sessions on Career Guidance by Mrs. Pallavi Kadam (2-3 PM) and Mobility Training by Mrs. Ujwala Bhanushali (3-5 PM). In the evening, blind participants showcased their musical talents, performing Hindi and Marathi songs, which created a memorable experience for all present. Rotary President Sanjay Bhagat and Rtn.Dr. Mahadev Narke also joined in the performances. The day concluded with dinner. On January 25, Dr. Pranjali Dhamane led yoga and pranayama from 6-8 AM, followed by breakfast and misal. Mr. Sangram Patil (10-11 AM) spoke about self-employment opportunities, while Prof. Abhijit Deshpande and Mr. Shashikant Sutar (11 AM-1 PM) guided participants on competitive exams. The camp concluded with participants sharing their experiences, a group photo, and lunch, followed by darshan at the Jyotirlinga temple on the return journey. The success of the camp was due to the efforts of event chairman Rtn. Sameer Joshi, Rtn. Vijay Relekar, and Rotary Central members. Thank you to all for making this event memorable.

Rotary | THE MAGIC OF ROTARY

# रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रल

नॅब कोल्हापूर व रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने

## अंधांसाठी व्यक्तिमत्व विकास शिबीर

१ ला दिवस – शुक्रवार दि.२४–०१–२०२५

| वेळ | विषय | मार्गदर्शकांचे नांव |
|---|---|---|
| ११.०० ते १२.०० | उदघाटन समारंभ | रो. राहुल कुलकर्णी, असिस्टंट गव्हर्नर.<br>डॉ. मुरलीधर डोंगरे, अध्यक्ष, नॅब<br>रो. संजय भगत, प्रेसिडेंट, रोटरी सेंट्रल |
| १२.०० ते १.०० | सर्वांचा परिचय | वैयक्तिक माहिती, छंद व कलागुण इ. |
| १.०० ते २.०० | दुपारचे जेवण | |
| २.०० ते ३.०० | करियर गाईडन्स | पल्लवी कदम,(एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर, नॅब इंडिया, मुंबई) |
| ३.०० ते ५.०० | मोबिलिटी ट्रेनिंग/<br>सफेद काठीचा वापर<br>(दृष्टीबाधितांच्या करियर विकासामध्ये मोबिलिटीची भूमिका) | उज्वला भानुशाली नॅब इंडिया, मुंबई |
| ५.०० ते ६.०० | चहापान | |
| ६.०० ते ८.०० | अंधांचा विविध गुणदर्शन कार्यक्रम | |
| ८.०० ते ९.०० | रात्रीचे जेवण | |

२ रा दिवस शनिवार दि. २५/०१/२०२५

| वेळ | विषय | मार्गदर्शकांचे नांव |
|---|---|---|
| ६.०० ते ७.०० | टेकडी ट्रेकिंग | |
| ७.०० ते ८.०० | योगा व व्यायाम | डॉ. प्रांजली धामणे आणि टीम |
| ८.०० ते १०.०० | अंघोळ व चहा नाश्ता | |
| १०.०० ते ११.०० | स्वयंरोजगाराच्या विविध संधी बाबत माहिती | संग्राम पाटील, नॉर्थ इंडिया प्रमुख, इक्विटास ट्रस्ट. |
| ११.०० ते १.०० | विविध स्पर्धा परीक्षांबाबत मार्गदर्शन | प्रा. अभिजित देशपांडे, श्री. शशिकांत सुतार, विकास अधिकारी, अरुण नरके फौंडेशन,कोल्हापूर |
| १.०० ते २.०० | उपस्थित अंधांचे मनोगत (प्रतिक्रिया) | |
| २.०० ते ३.०० | दुपारचे जेवण | |
| ३.०० से ३.३० | समारोप | |
| ३.३० ते ५.३० | जोतीबा दर्शन | |

रो. संजय भगत
प्रेसिडेंट, रोटरी सेंट्रल

रो. समीर जोशी
प्रोजेक्ट चेअरमन

रो. रविंद्र खोत
सेक्रेटरी

अभिप्राय

नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड आणि रोटरी क्लब कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने भरवलेल्या या शिबिराने अंध विद्यार्थ्यांना शिक्षण, रोजगार, स्वावलंबन आणि आरोग्य यासंदर्भात मोलाचे मार्गदर्शन मिळवून दिले.

पहिल्या दिवशी नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड चे पदाधिकारी आणि पल्लवी कदम यांनी रोजगार आणि शिक्षणाच्या संधींबाबत माहिती दिली तसेच अंध विद्यार्थ्यांना कॉर्पोरेट क्षेत्रात नोकरी मिळवण्याच्या मार्गदर्शनाने प्रेरित केले. त्यानंतर उज्वला भानुषाली यांनी मोबिलिटी प्रशिक्षण देत स्वावलंबन आणि आत्मविश्वास वाढवण्यावर भर दिला. संध्याकाळी झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला, गाणी आणि वादनाच्या सादरीकरणाने वातावरण आनंदी झाले.

दुसऱ्या दिवशी सकाळी प्रांजली मॅम यांनी व्यायामाविषयी प्रात्यक्षिके घेत शारीरिक आरोग्याची जाणीव करून दिली. त्यानंतर अरुण नरके फाउंडेशन तर्फे स्पर्धा परीक्षांचे मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले. इक्विटास फायनान्स तर्फे कार्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी उद्योग संधी उपलब्ध करून देण्यात आल्या.

शिबिराची उत्तम व्यवस्थापन, निसर्गरम्य परिसर आणि सकस आहार यामुळे विद्यार्थी अधिक प्रेरित झाले. शेवटी सर्वांनी परिसराचा आनंद घेत शिबिराची सांगता आनंदात झाली.

– अथर्व कोळेकर



कोल्हापूर : नॅब कोल्हापूर व रोटरी क्लब यांच्यतर्फे आयोजित शिबिराच्या दीपप्रज्वलनप्रसंगी राहुल कुलकर्णी, डॉ. मुरलीधर डोंगरे आदी.

### अंधांसाठी व्यक्तिमत्त्व विकास शिबिर

**कोल्हापूर :** यापुढे शहरातील सर्व रोटरी क्लब एकत्र येऊन दृष्टीहिनांसाठी मोठ्या प्रमाणावर काम करून विविध उपक्रम राबवू, असे आश्वासन रोहित कुलकर्णी यांनी दिले. रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रल व नॅब कोल्हापूर यांच्यातर्फे अंधांसाठी आयोजित व्यक्तिमत्त्व विकास शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. नॅबचे अध्यक्ष डॉ. मुरलीधर डोंगरे, नॅब मुंबईच्या संचालिका पल्लवी कदम, रोटरी सेंट्रलचे अध्यक्ष संजय भगत प्रमुख उपस्थित होते. दोन दिवस चाललेल्या या शिबिरात सफेद काठीचा वापर, टेकडी ट्रेकिंग, योगा-व्यायाम, स्वयंरोजगाराच्या संधी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. शिवानंद पिसे, बदाम पाटील, उज्ज्वला भानुपिसे उपस्थित होते. डॉ. मीना डोंगरे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. मुरलीधर डोंगरे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर विजय रेळेकर यांनी आभार मानले.

तरुण भारत



पुलाची शिरोली : रोटरी क्लब ऑफ सेंट्रलच्या अंध, दिव्यांग मुलांच्या शिबिर उद्घाटनप्रसंगी उद्योजक संजय भगत, बदाम पाटील व इतर.

### दिव्यांगांच्या व्यक्तिमत्त्व विकास शिबिरास प्रतिसाद

वार्ताहर
पुलाची शिरोली

▪ उद्योजक संजय भगत, डॉ. महादेव नरके यांचा पुढाकार

रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रल व नॅशनल असोशियेशन फॉर ब्लाईंड (नॅब) कोल्हापूर यांच्या संविद्यमाने अंध मुले व मुलींसाठी व्यक्तिमत्त्व विकास शिबिर सादळे–मादळे येथे निसर्गरम्य हील स्टेशनवर घेण्यात आले होते.

कोल्हापूरातील अंध मुले व मुलींना डी. वाय. पाटील ग्रुपच्यावतीने देण्यात आलेल्या बसमधून सादळे मादळे येथे पोहचविल्यानंतर शिबिराचा उद्घाटन समारंभ पार पडला. या उद्घाटनप्रसंगी रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रलचे प्रेसिडेंट संजय भगत, रोटरीचे असिस्टंट गव्हर्नर राहुल कुलकर्णी, बदाम पाटील, विजय रेळेकर, नॅब कोल्हापूरचे अध्यक्ष मुरलीधर डोंगरे, नॅब इंडिया मुंबईच्या एक्झीक्युटिव डायरेक्टर पल्लवी कदम, नॅब इंडियाच्या उज्वला भानुशाली, सर्व दृष्टी बाधित मुले मुली व नॅबशी संबधित मान्यवर उपस्थित होते.

पल्लवी कदम यांनी करियर गाईडन्सविषयी मार्गदर्शन केले. उज्वला भानुशाली यांनी मोबिलीटी ट्रेनिंग, सफेद काटीचा वापर व अंधांच्या करियर विकासामध्ये मोबीलीटीची भूमिका याविषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर सायंकाळी अंध मुला मुलींचा विविध गुणदर्शनाचा , हिंदी मराठी गीतांचा कार्यक्रम सादर करण्यात आला.

डॉ. प्रांजली धामणे यांनी योगा व प्राणायाम करून घेतले. संग्राम पाटील, इकिटास ट्रस्ट, नॉर्थ इंडिया प्रमुख, यांनी अंधांसाठी स्वयंरोजगाराच्या विविध संधी याबाबत मार्गदर्शन केले. प्रा. अभिजित देशपांडे, शशिकांत सुतार, विकास अधिकारी, अरुण नरके फौंडेशन, कोल्हापूर, यांनी अंधांसाठी विविध स्पर्धा परीक्षेबाबत मार्गदर्शन केले व अंध मुला मुलींच्या विविध शंकांचे, प्रश्नांचे उत्तर देवून समाधान केले.

शिबिर पार पाडण्यासाठी इव्हेंट चेअरमन समीर जोशी, विजय रेळेकर, रोटरी सेंट्रलच्या मेंबर्सचे सहकार्य लाभले.

## BOD Meeting 30 jan



जानेवारी २०२५ या महिन्याची BOD दिनांक ३० जानेवारी रोजी कलेक्टर ऑफिस कॅन्टीन येथे सकाळी घेण्यात आली .

BOD मधील विषय खालीलप्रमाणे.

१) मागील BOD  मधील विषय वाचून दाखवले.

२) जानेवारी महिन्यात झालेल्या प्रोजेक्ट ची माहिती खालीलप्रमाणे.

३) २ जानेवारी रोजी तीटवे, ता. राधानगरी येथील शहीद विरपत्नी लक्ष्मी गर्ल्स महाविद्यालय येथे गोधडी प्रशिक्षण एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेमध्ये मुलींना वेगवेगळी शिवण कामाची प्रात्यक्षिक दाखविण्यात आली व करून घेण्यात आली. श्रीमती स्मिता खामकर मॅडम यांनी ही कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेला रोटरी सेंट्रल चे प्रेसिडेंट संजय भगत, रो. बदाम पाटील, रो. सागर चौगले, संयोगिता भगत उपस्थित होते. कार्यशाळेमध्ये २०० विद्यार्थिनींनी भाग घेतला. प्रोजेक्ट खर्च –७५००.००

४) १० जानेवारी रोजी रामनगर विद्यामंदिर नं.३, येथे रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रल मार्फत व कोहिनूर मेटॅलिक्स यांच्या सहकार्याने मुले मुली व अपंग विद्यार्थी यांच्यासाठी स्वच्छता गृह बांधण्यात आले त्याचे उद्घाटन व हस्तांतरण करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हापरिषद कोल्हापूर, शिक्षण अधिकारी, श्रीमती मीना शेंडकर मॅडम व भरत रसाळे सर उपस्थित होते. यावेळी स्थानिक ग्रामस्थ, ग्रामपंचायत चे सरपंच व पदाधिकारी तसेच रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रल चे मेंबर उपस्थित होते. यावेळी शाळेला लायब्ररी साठी ४०००.००ची पुस्तके भेट देण्यात आली.

प्रोजेक्ट खर्च –१८९०००.००

५) १२ जानेवारी रोजी सेतू या सामजिक संस्थे तर्फे कर्ण बधीर मुलांच्या विविध प्रकारच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धांच्या बक्षीस वितरण कार्यक्रमाला रोटरी सेंट्रल चे प्रेसिडेंट संजय भगत यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

६) उप जिल्हा रुग्णालय गांधीनगर यांनी रोटरी सेंट्रल कडे रुग्णालयामधे स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय करण्याची मागणी केली होती. त्यासाठी प्रेसिडेंट संजय भगत,रो. अविनाश चिकानिस, रो. निलेश पाटील यांनी रुग्णालयाला भेट देऊन माहिती घेतली.

७)१९ जानेवारी रोजी सकाळी सात वाजता ताराराणी चौक कोल्हापूर येथे राजश्री शाहू ज्येष्ठ नागरिक संघटना व रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिक यांची जलद चालण्याची स्पर्धा आयोजित करण्यात आली. स्पर्धे मध्ये ६० ते ७० स्त्री व पुरुष ज्येष्ठ नागरिक यांनी सहभाग घेतला. बक्षीस वितरण रोटरी सेंट्रल चे प्रेसिडेंट संजय भगत व रो. नरेश शिंगाडे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रोजेक्ट खर्च –५०००.००

८) २० जानेवारी रोजी क्लब ची तिसरी विकली मीटिंग चे निमित्ताने न्स यांचे संक्रांती चे हळदी कुंकू गेट टुगेदर घेण्यात आले. यावेळी सर्व न्सनी गेम्स, गाणी एकत्र एन्जॉय केली.

९) रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रल व नॅशनल असोषियेशन फॉर ब्लाइंड कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने अंध मुला,मुलींच्या साठी व्यक्तिमत्त्व विकास दोन दिवसीय निवासी शिबिर सादळे मादळे कोल्हापूर येथील चैतन्य रिसॉर्ट येथे २४ व २५ जानेवारी रोजी घेण्यात आले.
यामधे ५० मुले व मुली यांनी भाग घेतला. यावेळी अंध मुला मुलींना वेगवेगळ्या क्षेत्रातील तज्ज्ञ लोकांच्या कडून त्यांच्या करियर विषयी व जीवनोपयोगी वेगवेगळ्या इन्स्ट्रूमेंट विषयी मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी पाहिल्या दिवशी सायंकाळी अंध मुला मुलींचां विविध गुंदर्षणांचा ऑर्केस्ट्रा सादर करण्यात आला. हिंदी मराठी गीतांचा कार्यक्रम झाला अफलातून झाला. उपस्थित सर्व रोटरियन भारावून गेले.
या प्रोजेक्ट साठी सर्व सेन्ट्रल चे क्लब मेंबर यांनी आर्थिक सहकार्य केले. सर्वांचे आभार.

१०) २६ जानेवारी रोजी भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त स्वयम मतिमंद मुलांच्या स्कूल मधील मुलांच्या बरोबर ध्वजारोहण केले व मुलांच्या विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमाचा आनंद घेतला .

११) ३१ जानेवारी रोजी डिस्ट्रिक्ट कॉन्फरन्स साठी रोटरी सेंट्रल चे २१ मेंबर बेळगांव मध्ये उपस्थित राहिलो.




## District Conference 31 January 2025 at Belgavi





























Big shout out to the **ROTARY CLUB OF KOLHAPUR CENTRAL** ..This club had organised career Counseling & Psychometric testing for more than **1000** students & covered near abt **15 schools** in the last one week...

This project is initiated by **Rotary Club of Kolhapur Central (President Rtn. Sanjay Bhagat) in association with Vatsalya Foundation (Rtn. M.B. Shaikh) & T.B.Lulla Foundation ( Rtn. Kishor Lulla)..**

Thank you so much for your valuable contribution for 1000+ students bright future .

Regards
Rtn.CA. Monica Baldawa
RID 3170 Project Pathway
to Success Career
Guidance Initiative



*Rotary Club of Kolhapur Central 2024-25*

Notice

*Date: 04/01/2025*

*Dear Member,*
*You are cordially invited to attend the Jan.1st weekly Meeting and December month Close Meeting will be held on Monday 6th Jan 2025 at 7 pm at मोतीबाई दोशी मेमोरियल हॉल रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर, स्वयम् स्कूल, नवीन कोर्ट च्या मागे कसबा बावडा रोड, कोल्हापूर*

*Subject: Jan 1st Meeting and Dec Close Meeting*

*This close meeting is arranged to Discuss following points*

1) *Last BOD Meeting Disscussion Presentation*
2) *Last Month Work Presentation*
3) *RPL Event Planning*
4) *District Conference Registration*
5) *District Grant Project Preparation*
6) *New Project Planning*
7) *Tressure Report*

*All members are requested to be present on time*

*Time: 7 pm*

*Menu: -*

| | | |
|---|---|---|
| *Rtn.Sanjay Bhagat* | *Rtn. Ravindra Khot* | *Rtn. Nilesh Patil* |
| *President* | *Secretary* | *Treasurer* |








## Rotary Club of Kolhapur Central 2024-25

### Notice

Date: 11/01/2025

Dear Member,
You are cordially invited to attend the Jan.2nd weekly Meeting will be held on Monday 13th Jan 2025 at 7 pm at मोतीबाई दोशी मेमोरियल हॉल रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर, स्वयम् स्कूल, नवीन कोर्ट च्या मागे कसबा बावडा रोड, कोल्हापूर

Subject: Jan 2nd Meeting

This Meeting is arranged to Discuss following points

1) RPL Event Planning
2) District Conference Registration
3) Voting deligate finalzation
4) District Grant Project Preparation
5) New Project Planning

All members are requested to be present on time

Time: 7 pm

Menu: - Misal

| Rtn.Sanjay Bhagat | Rtn. Ravindra Khot | Rtn. Nilesh Patil |
|---|---|---|
| President | Secretary | Treasurer |









## Rotary Club of Kolhapur Central 2024-25

### Notice

Date: 25/01/2025

Dear Member,
You are cordially invited to attend the Jan.4rth weekly Meeting will be held on Monday 27th Jan 2025 at 7 pm at मोतीबाई दोशी मेमोरियल हॉल रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रल,स्वयम् स्कूल, नवीन कोर्ट च्या मागे कसबा बावडा रोड, कोल्हापूर

Subject: Jan 4rth Weekly Meeting

This Meeting is arranged to Discuss following points

1) RPL Event Planning
2) District Confarance Event Disscussion
3) District Grant Project Preparation
4) New Project Planning

All members are requested to be present on time

Time: 7 pm

Menu: -

| Rtn.Sanjay Bhagat | Rtn. Ravindra Khot | Rtn. Nilesh Patil |
|---|---|---|
| President | Secretary | Treasurer |







# पॉझिटिव्ह थॉट्स

मला कधीही बरा न होऊ शकणारा कॅन्सर झाला होता. डॉक्टर म्हणाले, या मुलाला घरी घेऊन जा, स्पेन्ड टाइम विथ हिम. आम्ही आता काहीही करू शकत नाही. ह्या जगात निर्णय घेण्याचा हक्क प्रत्येकाला असतो पण जो आपलं, आपल्या माणसांचं अन् या जगाचं भवितव्य बदलू शकतो असा निर्णय फार कमी लोक घेऊ शकतात. असाच एक निर्णय माझ्या आईने घेतला. माझ्या आईने डॉक्टरांना विचारले, माझ्या मुलाच्या जगण्याचे किती चान्सेस आहेत? डॉक्टरांनी ९६% माझा मृत्यूच होईल असे सांगितले. माझ्या आईने त्या ९६% कडे न पाहता उरलेल्या ४% कडे पाहिले आणि मला घरी घेऊन आली.

अमेरिकेतून आलेल्या एका डॉक्टरांनी माझ्या आईची भेट घेतली. त्यांनी माझ्या आजारावर एक औषध टेस्ट करतो आहे असे सांगितले. अजून ते औषध माणसांवर ट्राय केलेले नव्हते, फक्त प्राण्यांवर ट्राय झाले होते. ते डॉक्टर केवळ २५ मुलांवर ते औषध ट्राय करणार होते. एकही क्षण न घालवता आईने डॉक्टरांना तात्काळ होकार दिला. पहिल्या महिन्यात २५ पैकी २० मुले दगावली. काही दिवसात अजून ४ गेली. मी एकटा उरला होतो. रोज डॉक्टर येत आणि त्यांची बॅग उघडून औषध काढून देत असत.

इंग्लिश डिक्शनरीतल्या डॅंीश या शब्दापेक्षा केशि हा शब्द जास्त पावरफुल आहे असे मला नेहमी वाटते. लोकांना वाटते मी वाचलो कारण मी लकी होतो. पण मी लकी नव्हतो मित्रांनो, माझ्या आईने मला लकी बनवले. ज्या औषधाने २४ मुलांचे प्राण वाचू शकले नाहीत ते औषध हृदयावर दगड ठेवून ती रोज मला टोचत होती. मग तो दिवस उजाडला आणि डॉक्टरांनी मला, मी बरा झालोय अशी बातमी दिली. पण मला सोडताना ते माझ्या आईला म्हणाले, हा मुलगा कधीही खेळू शकणार नाही, शाळेत जाऊ शकणार नाही, याने आपले टीन एज पाहिले तरी तो एक चमत्कार असेल. पण आपण चमत्कारांवर विश्वास ठेवतोच.

मी दवाखान्यात असतांना आईने मला एक वेलक्रो ग्लोव्ह आणि बॉल आणून दिला होता. तो मी तिच्याकडे फेकायचो. हळूहळू आईने अंतर वाढवले आणि माझ्यासमोर आव्हान उभे केले. मला त्या आव्हानांना चेस करून जिंकणे आवडू लागले. मग एक दिवस मी आईला म्हणालो, आई माझे एक स्वप्न आहे, मी अमेरिकेत बेसबॉल खेळणार! मित्रांनो, तुम्ही आयुष्यात काय करू शकता हे कोणीच सांगत नाही. पण तुम्ही काय करू शकणार नाही हे मात्र सगळेच सांगत सुटतात. माझ्या स्वप्नात अनेक अडथळे आले. मला ताप यायचा, मला मेंदूज्वर झाला. माझ्या आयुष्यात मला पहिला हार्टअटॅक आला तेव्हा मी फक्त १२ वर्षांचा होतो. लोक म्हणत होते, मी हे करू शकणार नाही, मी मात्र तेच करण्यासाठी झटत होतो. वयाच्या १७ व्या वर्षी मी अमेरिकेत बेसबॉल खेळायला गेलो.

एक स्वप्न सत्यात उतरले. पण आयुष्य हे रोलर कोस्टर सारखे असते. क्षणार्धात तुम्ही करिअरच्या उत्तुंग शिखरावर असता आणि दुसऱ्या क्षणाला आयुष्य तुम्हाला जमिनीवर आणून आपटत. ज्या बेसबॉलसाठी मी झटलो, त्याच बेसबॉल ग्राउंडवर मला वयाच्या १८ व्या वर्षी माझे करियर संपवणारा दुसरा हार्टअटॅक आला. मला घरी परत पाठवण्यात आले. नियती माझ्याशी अत्यंत 'अनफेअर' वागते आहे असे मला वाटायला लागले. मी डिप्रेशनमध्ये गेलो. रोज झोपतांना मी प्रार्थना करायचो, देवा मला उचलून घे. पण दुसऱ्या दिवशी मला जाग येत असे. तो परमेश्वर माझी ही प्रार्थना ऐकत नव्हता आणी मला मृत्यू येत नव्हता. पण परत एकदा मला माझा परमेश्वर इथेच भेटला आईच्या रुपात. तिने मला या नैराश्यातून बाहेर काढले.

नंतर मी बॅंकेची नोकरी जॉईन केली. एक दिवस एक उंचापुरा माणूस जो आमच्या बॅंकेचा सीइओ होता त्याचे मला बोलावणे आले. आम्ही कॉन्फरन्स हॉलमध्ये बसलो. त्याने प्रश्न विचारला, डाऊन द लाईन पाच वर्षे तू कुठे असशील? मी विचार केला आणि मला आईचे शब्द आठवले. दगड मारायचाच असेल तर चंद्राला मार. चंद्राला नाही लागला तर किमान कुठल्यातरी ताऱ्याला तरी लागेल. मी बॉसला म्हणालो, तुमच्या खुर्चीत! मित्रांनो, असे बॉसला म्हणू नये कारण ते कोणत्याही बॉसला आवडत नाही. माझ्या बॉसला पण आवडले नाही. त्याने माझा द्वेष करायला सुरुवात केली, मला त्रास द्यायला लागला. पण मित्रांनो, हा द्वेष आणि होणारा त्रासच माझ्या महत्वाकांक्षेचे फ्युएल ठरले. मी बेदम काम करायला लागलो. वर्षभरात मी ऑस्ट्रेलियाचा यंगेस्ट बॅंक मॅनेजर झालो, दोन वर्षात यंगेस्ट एरिया मॅनेजर, तीन वर्षांत यंगेस्ट स्टेट मॅनेजर, चार वर्षात यंगेस्ट नॅशनल मॅनेजर झालो. वयाच्या २३ व्या वर्षी माझ्या हाताखाली ६०० माणसे काम करत होती आणि मी ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड मिळून आमच्या बॅंकेच्या १२० ब्रांचेस सांभाळत होतो. माझ्याकडे मिलियन डॉलरचे घर होते, अरमानीचे सुट्स होते, रोलेक्सच घड्याळ होते, लाखभर डॉलरची कार होती. पण हे यश मटेरियलास्टिक होते. आपण ज्या जगात राहतो त्या जगाने आपल्याला काय दिले यापेक्षा आपण त्या जगाला काय दिले याचा विचार करणे जास्त महत्वाचे नाही का? हे जग माणसांसाठी राहण्यासाठी जास्त चांगली जागा कशी होऊ शकेल याचा विचार करणे जास्त महत्वाचे आहे. ज्यांनी आपल्यासाठी आयुष्य वेचले त्यांना आपण काहीतरी द्यायला हवे. मागील १६ जूनला असा एक क्षण माझ्या आयुष्यात आला. जी माझ्यासाठी सर्वस्व होती, आहे, अश्या माझ्या आईसाठी मी एक आलिशान घर घेतले. मी आईपासून एक गोष्ट लपवली होती. मी ७ वर्षाचा असतांना डॉक्टरांनी आईला जे सांगितले होते ते मी ऐकले होते. पण मला काहीही माहीत नाही अश्या आविर्भावात मी आईला विचारले होते. आई डॉक्टर काय म्हणाले? त्यावर आई म्हणाली होती, काही नाही, सर्व ठीक होईल. मला पहिला हार्टअटॅक आला तेंव्हाही आई म्हणाली होती, सर्व ठीक होईल. सर्व काही ठीक होईल हे तिचं वाक्य माझ्यावर ऋण होते. पण दैव बघा, यावर्षी मला तिचे हे ऋण फेडण्याची संधी मला मिळाली.



आईच्या घश्यात ४ ट्युमर डिटेक्ट झाले. आईने विचारले, डॉक्टर काय म्हणाले? मी म्हणालो, सर्व काही ठीक होईल. तुम्ही किती वेळ या पृथ्वीतलावर जगले याला महत्व नाही, इथे असतांना तुम्ही काय केले याला सर्वात जास्त महत्त्व आहे. तुमचे आयुष्य तुम्ही रिमार्केबल जगता की नाही हे महत्वाचे आहे. आपण घेतलेला एकूण एक श्वास, एकूण एक संधी महत्वाची आहे. आपल्याला मिळालेले हे आशीर्वाद आहेत. आपण या आशीर्वादांचे सोने करू शकतो की नाही हे महत्वाचे. आज इथे मी तुम्हाला आव्हान देतो, तुम्ही तुमच्या आयुष्याचे सोने करा, किमान माणसासारखे जगा. तुमच्या जगण्यावर, तुम्हाला आणि तुमच्या येणाऱ्या पिढीला गर्व वाटेल असे काही करा.

मित्रांनो, मी आहे मायकल क्रॉसलॅंड!

**Michael Crossland is an -uthor of the best seller book, Everything will be Ok: - story of Hope, Love and Perspective.**

# चालायला सुरुवात करा !

एका डॉक्टरने लिपिड प्रोफाइल एक सुंदर कथेच्या माध्यमातून समजावून सांगण्याचा प्रयत्न केला आहे.वेगळ्या पद्धतीचा हृदयस्पर्शी संदेश.आपल्या शरीराला एक छोटे गाव समजा. या गावातील मुख्य गोंधळ घालणारे म्हणजे कोलेस्टेरॉल. यांना एक साथीदार आहे – ट्रायग्लिसराईड्स. यांचे काम गावाच्या रस्त्यांवर गोंधळ घालणे आणि रस्ते अडवणे आहे.गावाचा मध्यभाग म्हणजे हृदय. गावातील सगळे रस्ते हृदयाकडे जातात. जेव्हा हे गोंधळखोर (कोलेस्टेरॉल आणि ट्रायग्लिसराईड्स) जास्त प्रमाणात वाढतात, तेव्हा काय होते? ते हृदयाचे काम बिघडवण्याचा प्रयत्न करतात.पण आपल्या शरीर–गावात एक पोलीस दलही आहे. एचडीएल (HDL) हे चांगले पोलीस आहेत. हे पोलीस गोंधळखोरांना पकडून जेलमध्ये (लिव्हरमध्ये) पाठवतात. लिव्हर नंतर त्यांना शरीरातून बाहेर फेकून देते.पण एक वाईट पोलीसही आहे – एलडीएल (LDL). तो शक्ती मिळवण्यासाठी गोंधळखोरांना जेलमधून सोडून पुन्हा रस्त्यावर पाठवतो.जेव्हा चांगले पोलीस (HDL) कमी पडतात, तेव्हा गावात गोंधळ माजतो. अशा गावात कोणाला राहायला आवडेल?तुम्हाला गोंधळखोर कमी करायचे आहेत का? चांगल्या पोलिसांची (HDL) संख्या वाढवायची आहे का?चालायला सुरुवात करा!प्रत्येक पावलाने चांगल्या पोलिसांची संख्या (HDL) वाढेल आणि गोंधळखोरांची संख्या (कोलेस्टेरॉल, ट्रायग्लिसराईड्स, आणि (LDL) कमी होईल.तुमचे गाव (शरीर) पुन्हा उत्साही होईल. गावाचा मध्यभाग म्हणजेच हृदय गोंधळखोरांच्या अडथळ्यांपासून (हृदय विकारांपासून) सुरक्षित राहील. आणि तुमचे हृदय निरोगी असेल, तर तुम्हीही निरोगी राहाल.म्हणूनच, वेळ मिळाला की चालायला सुरुवात करा!,,।

---

एकदा एका मंदिरात पूजेला एक राजा येणार आहे असे त्या पुजार्याला कळले... त्याने सहा हजार रुपयांचे कर्ज काढले आणि देऊळ चांगले सजवले रंगवले.

राजा पूजेला आला आणि त्याने दक्षिणा म्हणून चार आणे ठेवले. पुजार्याला तिथेच घाम फुटला. आपण सहा हजार कर्ज काढून मंदीर रंगवले आणि राजाने फक्त चार आणे दक्षिणा ठेवली... आता या चवण्णीछाप राजाला अद्दल घडवायचीच.

पुजारी हुशार होता... राजा गेल्यावर पुजार्याने ते चार आणे मुठीत घेतले आणि सगळ्यांना सांगू लागला...

राजाने मंदिरात दान केलेली एक वस्तू आहे. ती मला झेपणार नाही. म्हणून मी तिचा लिलाव करतोय. आपापली बोली लावा. आता राजाने वस्तू ठेवलीय म्हणल्यावर साधी ठेवली असेल का... ? पहिलीच बोली दहा हजार पासून... सुरु झाली. पुजारी डोके हालवूनच 'नाही परवडत' असे म्हणत होता. लिलावातील बोली वाढत वाढत पन्नास हजारावर पोचली.

तिकडे राजाला पहारेकरी म्हणाला, महाराज, पुजाऱ्याने आपण मंदीरात दान केलेल्या वस्तूचा लिलाव सुरु केला आहे आणि ती वस्तू तो दाखवतही नाही आणि सांगतही नाही, मुठीत ठेवलीय...

राजाला घाम फुटला. तो पळत पळत आला आणि पुजाऱ्याच्या डोक्यावरून हात फिरवून म्हणाला, हे माझ्या बाप्पा, सव्वालाख देतो पण कुणाला ती वस्तू दाखवू नको....

तेव्हा पासून ही म्हण रुजू झाली....

....झाकली मूठ सव्वालाखाची....

---

**लेख खुप सुंदर आहे. आपण एकदा नक्की वाचा:**

एअर कमांडर विशाल एक जेट पायलट होता.एका मिशन मध्ये त्याचं फायटर विमान मिसाईल ने उडवलं गेलं.तत्पूर्वी त्याने पॅराशूट घेऊन उडी मारली आणि बचावला.सर्वांनी त्याचं फारफार कौतुक केलं.

पाच वर्षांनंतर पत्नीसोबत तो एका रेस्टोरन्टमध्ये बसला असताना बाजूच्या टेबलवरील एक व्यक्ती त्याच्याजवळ आला आणि म्हणाला, तुम्ही कॅप्टन विशाल ना? तुम्ही जेट फायटर चालवायचात आणि ते पाडण्यात आले होते.

पण हे तुला कसे माहीत? विशालने त्याला विचारले.

तो मंद स्मित करीत म्हणाला, मीच तुमचं पॅराशूट पॅक करून विमानात ठेवत असे. विशाल आश्चर्य आणि कृतज्ञतेने आ वासून विचारात पडला की जर पॅराशूट नीट उघडलं नसतं तर मी आज इथे नसतो.

त्या रात्री विशाल त्या व्यक्तीच्या विचाराने झोपू शकला नाही. त्याला आश्चर्य वाटत राहिलं की, त्या व्यक्तीला कितीवेळा पाहिलं असेल,पण साधं शुभप्रभात,तू कसा आहेस? एवढं देखील आपण विचारलं नाही.का तर तो स्वतः फायटर पायलट आहे आणि ती व्यक्ती एक साधी सुरक्षा कामगार.

तर मित्रानो,तुमचं पॅराशूट कोण बरं पॅक करतेय?

प्रत्येकाला कोणी ना कोणी दिवसभरात काही न काही आवश्यक त्या गोष्टी पुरवत असतो.कुणीतरी मदत करत असतो.आनंदाने बोलत असतो.नमस्कार म्हणून अभिवादन करतो.

आपल्याला विविध प्रकारच्या पॅराशूटची आवश्यकता पडत असते– आपल्याला शारीरिक पॅराशूट,मानसिक पॅराशूट,भावनात्मक पॅराशूट आणि वैचारिक पैराशूट,बौद्धिक पॅराशूटची गरज पडत असते. सुरक्षा जोपासण्यासाठी आपण या सर्व आधारांची मदत घेत असतो.

काहीवेळा दैनंदिन आव्हानांना सामोरे जाताना आपण काहीतरी महत्वाचं विसरत असतो. आपण समोरच्याला हॅल्लो, प्लिज,धन्यवाद,कसे आहात, मजेत ना?, त्याच्या आयुष्यात घडलेल्या आनंददायी गोष्टींसाठी अभिनंदन,एखादी छानशी कॉम्प्लिमेंट किंवा त्यांच्यासाठी काहीही कारण नसताना काहीतरी चांगलं करावं हे करायचं राहून गेलं असणारच.

आता जरा आठवून पहा, ह्या वर्षभरात कोणी कोणी तुमचं पॅराशूट पॅक केलं ते.

या वर्षभरात ज्यांनी ज्यांनी शब्दांद्वारे,कृतीद्वारे, प्रार्थनेद्वारे,वंदनेद्वारे माझं पॅराशूट पॅक केलं आहे त्या सर्वांना मी धन्यवाद देऊ इच्छितो.कुणालाही गृहीत धरू इच्छित नाही.